# हिंजवडीतील आयटी कंपनीवर अतिरेकी हल्ला?

## 'एनएसजी' कमांडो दाखल झाल्याने खळबळ; मॉकड्रिल असल्याचे पोलिसांचे स्पष्टीकरण

**पिंपरी | प्रतिनिधी**

हिंजवडी आयटी पार्कमधील इन्फोसिस कंपनीत बुधवारी (दि. ६) दुपारच्या सुमारास राष्ट्रीय सुरक्षा रक्षक दल (एनएसजी) कमांडो, गुन्हे शाखा आणि स्थानिक पोलिसांच्या पथकांनी अचानक धडक दिली. अचानक वाढलेल्या या बंदोबस्तामुळे परिसरात काही वेळ अतिरेकी हल्ला झाल्याची चर्चा सुरू झाली. अनेक आयटी कर्मचाऱ्यांनी घाबरून सोशल मीडियावर पोस्ट केल्यामुळे अफवांना अधिक उधाण आले. मात्र, ही घटना केवळ मॉकड्रिल होती, असे स्पष्टीकरण पोलिसांनी दिल्याने नागरिकांनी सुटकेचा निःश्वास टाकला.



याबाबत सविस्तर वृत्त असे की, आज दुपारी इन्फोसिस कंपनीच्या मुख्य गेटवर अचानक एनएसजी कमांडो, पोलिस आणि गुन्हे शाखेचे अधिकारी सुसज्ज वाहनांसह दाखल झाले. काही जवानांनी परिसराची वेढा घालून झडती सुरू केली. कमांडो हत्यारांसह तैनात असल्याचे दृश्य पाहून उपस्थित आयटी कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले.

या कारवाईची बातमी काही मिनिटात वाऱ्यासारखी शहरभर पसरली. अनेकांनी 'अतिरेकी हल्ला झाला का?' असा प्रश्न विचारत सोशल मीडियावर पोस्ट टाकण्यास सुरुवात केली. काही पालकांनी कंपनीच्या संपर्क क्रमांकांवर फोन सुरू केले. या सगळ्या गोंधळामुळे इन्फोसिसच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ गोंधळ निर्माण झाल्याचे पहावयास मिळाले.

> “ इन्फोसिस परिसरात आज सुरू असलेली कारवाई नियोजित ‘मॉकड्रिल’ होती. अशा सरावांद्वारे अतिरेकी हल्ल्यासारख्या आपत्कालीन प्रसंगांमध्ये पोलिस, सुरक्षा यंत्रणा आणि कंपनी व्यवस्थापन यांच्यातील समन्वय तपासला जातो. नागरिकांनी घाबरू नये. ही केवळ सुरक्षा चाचणी होती.
>
> **- विशाल गायकवाड, पोलिस उपायुक्त, पिंपरी- चिंचवड.**

# प्रारूप प्रभागरचना नगरविकास विभागाकडे सादर

## 22 ऑगस्टला महापालिकेच्या वतीने प्रभागरचना प्रसिद्ध करण्यात येणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेची चारसदस्यीय प्रभागरचना राज्य शासनाच्या नगर विकास विभागाला महापालिका निवडणूक विभागाने मंगळवारी (दि.५) सादर केली. प्रभागरचनेचा नकाशा यानंतर मान्यतेसाठी निवडणूक आयोगाकडे पाठविण्यात येणार आहे. त्यानंतर २२ ऑगस्टला महापालिकेच्या वतीने प्रभागरचना प्रसिद्ध करण्यात येणार आहे. प्रभागरचनेची हद्द कशी आहे, याबाबत राजकीय वर्तुळासह इच्छुकांमध्ये उत्सुकता वाढली आहे.

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका




येत्या काही महिन्यांमध्ये होणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांची सन २०१७ ला होणारी निवडणूक आता होत असल्याने माजी नगरसेवकांसह इच्छुकांमध्ये प्रचंड उत्सुकता आहे. प्रभागरचना कशी असणार, याबाबत तर्क-वितर्क लढविले जात आहे. महापालिकेच्या निवडणूक विभागाकडे त्याबाबत वारंवार विचारणा केली जात आहे.

दरम्यान, महापालिका १२ मार्च २०२२ रोजी बरखास्त झाली. तेव्हापासून म्हणजेच १३ मार्च २०२२ पासून महापालिकेमध्ये प्रशासकराज सुरू आहे. आयुक्त हेच संपूर्ण कामकाज पाहत आहेत. आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली निवडणूक विभागाचे सहाय्यक आयुक्त अविनाश शिंदे यांच्या पथकाने प्रभागरचनेचे नकाशे तयार केले आहेत. शहराची सन २०११ ची जनगणना विचारात घेऊन प्रत्येक प्रभागातील मतदारसंख्या निश्चित करण्यात आली आहे. महापालिकेच्या समितीने तयार केलेल्या प्रभागरचनेवर आयुक्त शेखर सिंह यांनी तपासणी करून रविवारी (दि.३) स्वाक्षरी केली आहे.

प्रारूप प्रभागरचनेचा नकाशा राज्य शासनाच्या नगर विकास विभागाकडे मंगळवारी (दि.५) सादर केले आहेत. त्यानंतर नकाशे राज्य निवडणूक आयोगास ६ ते ११ ऑगस्ट या कालावधीत सादर केला जाणार आहे. आयोगाकडून मान्यता मिळाल्यानंतर प्रारूप प्रभागरचनेचे नकाशे २२ ऑगस्टला प्रसिद्ध करून त्यावर २८ ऑगस्टपर्यंत हरकती व सूचना घेतल्या जाणार आहेत. दरम्यान, नवीन प्रभाग रचना फेब्रुवारी २०१७ च्या निवडणुकीनुसार असणार असल्याचे सांगितले जात आहे. त्यानंतर दिवाळीनंतर डिसेंबर ते जानेवारी महिन्यात महापालिका निवडणुकांचा बार उडण्याची शक्यता आहे.

# मुंबई-पुणे फास्ट ट्रॅक प्रकल्पाचा सर्व्हे करा..!

## शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

मुंबई-पुणे फास्ट ट्रॅक प्रकल्पाचा सर्व्हे करुन डीपीआर लवकर पूर्ण करावा. हा प्रकल्प मुंबई-पुणे प्रवास अधिक जलद, सुरक्षित आणि प्रवाशांना सुलभ करणारा ठरणारा आहे. दोन्ही शहरांमधील वाढती वाहतूक आणि रेल्वेवरचा ताण लक्षात घेता, फास्ट ट्रॅक सेवा ही काळाची गरज आहे. तसेच पुणे-लोणावळा ते पुणे ही दुपारी दीड वाजताची लोकल आणि कोरोना काळात बंद केलेले थांबे पुन्हा सुरु करावेत, अशी मागणी शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली.



खासदार बारणे यांनी रेल्वेमंत्री वैष्णव यांची दिल्लीत भेट घेतली. मावळ लोकसभा मतदारसंघातील रेल्वे संदर्भातील विविध प्रश्नांबाबत चर्चा केली. दीड वाजताची लोकल आणि कोरोना काळात बंद केलेले थांबे पुन्हा सुरु करण्याची ग्वाही वैष्णव यांनी दिली. याबाबतचे सविस्तर निवेदन खासदार बारणे यांनी रेल्वेमंत्र्यांना दिले आहे. त्यात म्हटले आहे की, पुणे औद्योगिक, व्यापार, शैक्षणिक हब आहे. प्रवाशांना असुविधांचा सामना करावा लागत आहे. मुंबई-पुणे कॉरिडॉरअंतर्गत पनवेल, तळोजा, तळेगाव, चाकण, पिंपरी-चिंचवड, हिंजवडी ही औद्योगिक क्षेत्र येत आहेत. देशाच्या अर्थव्यवस्थेत महत्वाचे योगदान देत आहेत. या भागात मालवाहतूक रेल्वे मार्ग बनविण्याची मागणी आहे. मुंबई-पुणे मार्गावर नवीन रेल्वे मार्गाची आवश्यकता आहे. त्यासाठी मुंबई-पुणे फास्ट ट्रॅक प्रकल्पाचा सर्व्हे करुन डीपीआर लवकर पूर्ण करावा. हा मार्ग झाल्यास पश्चिम महाराष्ट्र, मुंबईच्या कनेक्टिव्हीटीला बळ मिळेल.

कोरोना काळात लोणावळा-पुणे लोकलचे नियोजन बदलले होते. दुपारच्या वेळेत लोकल धावत नाही. त्याचा विद्यार्थ्यांना, शिफ्ट ड्युटी करणाऱ्या कामगारांना, विविध कार्यालयीन किंवा वैयक्तिक कारणांसाठी प्रवास करणाऱ्या सामान्य नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागतो आहे.

त्यात सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. विद्यार्थ्यांसह कामगारांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी दुपारी दीड वाजताची पुणे-लोणावळा लोकल सेवा नियमित सुरू ठेवावी. कोरोना काळात बंद करण्यात आलेल्या लांब पल्ल्याच्या रेल्वेगाड्यांचे मावळ लोकसभा मतदारसंघातील स्थानकांवरील थांबे पुन्हा सुरू करण्यात यावेत. या थांब्यांमुळे केवळ प्रवाशांना सुविधा मिळणार नाही, तर या स्थानकांची आर्थिक व प्रशासकीय महत्त्वही वाढणार आहे.

पुणे ते लोणावळा या लोकलमधून दररोज एक लाख नागरिक प्रवास करत आहेत. पुणे-लोणावळा लोहमार्गावरील रेल्वे गाड्या दोन ट्रॅकवरून धावत आहेत. या मार्गावर तिसर्या आणि चौथ्या ट्रॅकसाठी 2017 मध्ये मान्यता दिली आहे. याबाबतचा सर्व्हेही झाला आहे. ट्रॅक उभारण्यासाठी रेल्वे विभागाकडे जमीनही उपलब्ध आहे. पुणे-लोणावळा दरम्यान तिसऱ्या आणि चौथ्या ट्रॅकच्या कामाला आवश्यक ती गती मिळत नसल्याने प्रवाशांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. या ट्रॅकचे काम पूर्ण झाल्यास पुणे आणि मुंबई दरम्यानची रेल्वे वाहतूक अधिक जलद व सुगम होईल. त्यामुळे या कामाला गती देण्याची मागणीही खासदार बारणे यांनी केली.

# वल्लभनगर आगारात 19 सीसीटीव्ही बसविणार

## चोरीच्या घटना आणि गैरकृत्य रोखण्यास मदत होणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन (एसटी) महामंडळाच्या वल्लभनगर (पिंपरी-चिंचवड) आगारात नवीन १९ सीसीटीव्ही बसविण्यात येणार आहेत. त्यामुळे आता हा सर्व परिसर सीसीटीव्हीच्या निगराणीखाली येणार आहे. स्थानकातील चोरीच्या घटना आणि गैरकृत्य रोखण्यास मदत होणार आहे.

पिंपरी चिंचवड शहरात वल्लभनगर एस.टी. आगार एकमेक स्थानक आहे. या आगारातून दररोज मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र येथून बसेस धावतात. दररोज हजारो प्रवासी येथून प्रवास करतात. आगारात छोट्या-मोठ्या चोरीच्या घटना घडतात. आगारात मद्यपींचा वावर वाढलेल्याने प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर असल्याचे दिसून येते. दुसरीकडे आगारात केवळ सहाच कॅमेरे आहेत. इतक्या मोठ्या आगाराची सुरक्षा केवळ सहा कॅमेऱ्यांवरच अवलंबून आहे.



> वल्लभनगर आगाराची पाहणी करण्यासाठी महामंडळाची समिती आली होती. या समितीने आगारात नवीन सीसीटीव्ही लावण्यासाठी जागा निश्चित केल्या आहेत. आगारात नवीन १९ सीसीटीव्ही लावण्यात येणार असून बस स्थानकाचा सर्व परिसर यात येणार आहे. पण, मागील बाजूस महामेट्रोने जागा घेतली आहे. तेथे त्यांनी सीसीटीव्ही लावावेत.
>
> **- बालाजी सूर्यवंशी, आगार व्यवस्थापक**

आगारातील बराचसा भाग अजूनही कॅमेऱ्याच्या नजरेत नाही. संत तुकारामनगर मेट्रो स्टेशनच्या बाजूने एसटीच्या जागेत पार्किंग व्यवस्था केली आहे. येथे सीसीटीव्ही नाहीत. याबाबत 'सकाळ'ने २० मे रोजी 'वल्लभनगर आगाराचा सुरक्षेचा प्रश्न जैसे-थे' या मथळ्याखाली वृत्त प्रसिद्ध केले होते. यानंतर प्रशासन खडबडून जागे झाले होते. आगारातील सुरक्षेचा आणि सीसीटीव्हींची संख्या याबाबत 'सकाळ'ने प्रश्न लावून धरला होता. अखेर एसटी प्रशासनाला जाग आली असून सोमवारी (ता. ४) एसटी सुरक्षा (सीसीटीव्ही) समितीने आगाराची पाहणी करून तेथील सीसीटीव्ही लावण्याची ठिकाणे निश्चित केली. आगारात नवीन १९ कॅमेरे बसविण्याचे निश्चित झाले असून आता आगारातील एकूण कॅमेरांची संख्या २५ होणार आहे.

# चऱ्होली परिसरात बिबट्याचा वावर

## नागरिकांत भिती; वनविभागाला कळविल्यानंतरही गांभीर्य नाही

**पिंपरी | प्रतिनिधी**

चऱ्होली बु,परिसरात मागील पाच-सहा दिवसापासून बिबट्याचा वावर आढळून आला असून,वाडी-वस्तीवर राहणाऱ्या बहुतांश लोकांना तो दिसूनही आलेला आहे. स्थानिकांनी वनविभागाला तत्काळ कळविले आहे. मात्र दोन दिवसांनंतरही काहीच हालचाल केली नाही. त्यामुळे परिसरातील नागरिक भितीच्या सावटाखाली आहे.



बिबट्या जोपर्यंत जेरबंद होत नाही, तोपर्यंत मुलांनाही शाळेत पाठवणार नसल्याने मुलांचे शैक्षणिक नुकसान होणार आहे. त्यामुळे वनविभागाने गांभिर्याने बिबट्याचा शोध घेऊन जेरबंद करावे अशी मागणी केली जात आहे.

चऱ्होली गावच्या पश्चिम बाजूचा डोंगराळ,तसेच बागाईत शेतीचा परिसर असल्यामुळे रात्री -अपरात्री नागरिकांची वर्दळ चालू असते.गावाला लागूनच शिक्षण संस्था असून वाडी-वस्तीला,महानगरपालिकेच्या शाळा असून विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे. एवढेच नाही तर चार-पाच शाळेच्या ठिकाणी बिबट्याच्या भीतीमुळे विद्यार्थ्यांनी शाळेत जाणे देखील बंद केलेले आहे.किंबहुना बिबट्या जोपर्यंत वनविभागाकडून जेरबंद करण्यात येणार नाही.तोपर्यंत तरी पालक आपल्या विद्यार्थ्याला शाळेत पाठवण्यासाठी तयार नाहीत.याचाच परिणाम म्हणून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान देखील होत असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे.

वनविभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी या तक्रारीची दखल घेऊन बिबट्यास तातडीने जेरबंद करण्यात येऊन नागरिकांना दिलासा देण्यात यावा. तसेच वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी तत्काळ कारवाई न केल्याने, संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी मा.महापौर नितीन काळजे,सचिन तापकीर, तनिष प्राईड सोसायटी बुर्डे वस्ती येथील सोसायटी, के.के.मिडास, श्रीराम कॉलनी, तसेच चऱ्होली ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली आहे.

# पंतप्रधान आवास योजनेतून आता लाभार्थ्यांना मोठी सदनिका..!

## केंद्र शासनाच्या गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालयाने पंतप्रधान आवास योजनेचा दुसरा टप्पा म्हणजेच पीएमएवाय 2.0 योजना सुरु केली आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालयाने पंतप्रधान आवास योजनेचा दुसरा टटप्पा म्हणजेच पीएमएवाय २.० योजना सुरु केली आहे. या अंतर्गत आवास योजनेतील लाभार्थ्यांना आता 30 चौरस मीटर ऐवजी 45 चौरस मीटर चटई क्षेत्राची मोठी सदनिका दिली जाणार आहे. योजनेतील नियम-अटींमध्येही बदल करण्यात आले आहेत. पिंपरी-चिंचवड महापालिकेने आवास योजनेच्या दुस-या टप्प्यात नऊ ठिकाणी भुखंड प्रस्तावित केले असून तेथे गृहप्रकल्प बांधण्यात येणार आहेत.

महापालिकेने केंद्र शासनाच्या पंतप्रधान आवास योजनेंतर्गत चऱ्होली, बोऱ्हाडेवाडी, आकुर्डी, पिंपरी हे प्रकल्प पूर्ण केले आहेत. तेथील घरांचे लाभार्थ्यांना हस्तांतरण करण्यात आले. तर, डुडूळगाव प्रकल्पाचे काम सुरू असून त्यासाठी लाभार्थ्यांचे अर्ज मागविण्यात आले आहे.

तर, रावेत प्रकल्प रद्द करण्याची नामुष्की पालिकेवर ओढावली. मात्र, तेथील लाभार्थ्यांना किवळेमध्ये सदनिका देण्यात येत आहेत. ते सर्व प्रकल्प पूर्ण करण्यास ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. तर, आता शासनाने पीएमएवाय २.० योजना जाहीर केली. या योजनेतून पिंपरी महापालिका शहरात हजारो सदनिका बांधणार आहे.

महत्त्वाची बाब म्हणजे आवास योजनेतील या दुस-या टप्प्यात लाभार्थ्यांना मोठे घर मिळणार आहे. यापूर्वीच्या लाभार्थ्यांना ३० चौरस मीटर चटई क्षेत्राचे सदनिका दिलेली आहे. परंतु, आता ४५ चौरस मीटर चटई क्षेत्र असलेली सदनिका दिली जाणार आहे. याशिवाय, पात्र झोपडपट्टीवासीयांनाही या योजनेच्या कक्षेत घेण्यात आले आहे पिंपरी महापालिकेने विकास आराखड्यातून आर्थिक दुर्बल घटक वर्गासाठी ९ भूखंड आरक्षित केले आहेत.

तसेच, एचडीएच अंतर्गत अतिरिक्त भूखंड निश्चित केले आहेत. तेथे पीएमएवाय २.० अंतर्गत गृहप्रकल्प उभारणून सदनिका बांधण्यात येणार आहेत. त्यांतून रावेत येथे गृहप्रकल्पासाठी सल्लागाराची नियुक्तीही करण्यात आली आहे. तसेच, परवडणाऱ्या घरांच्या व्याप्ती व गुणवत्तेमध्ये सुधारणेसाठी काही निकष लागू केले आहेत. त्यानुसार हा प्रकल्प राबवण्याचे नियोजन केल्याचे पिंपरी महापालिकेच्या अधिका-यांना म्हटले आहे.




### उत्पन्न मर्यादा ३ लाखांवरून ६ लाख

» शहरी भागातील नोकरदार वर्गाला उत्पन्न तीन लाखांपेक्षा अधिक असूनही घरांच्या किमती अधिक असल्याने घर घेता येत नाही. दुसरकीडे यापूर्वी पंतप्रधान आवास योजनेतून सदनिकेचा लाभ घेण्यासाठी ३ लाख उत्पन्नाची मर्यादा होती. ही मर्यादा ओंलाडणारे अनेक लाभार्थी अपात्र ठरत होते. मात्र, केंद्र शासनानेपीएमएवाय २.० मध्ये अटींमध्ये उत्पन्न मर्यादित महत्त्वाचा बदल केला आहे. उत्पन्नाची मर्यादा ३ लाखांवरून ६ लाखांपर्यंत केली आहे. अनेक लाभार्थ्यांना आवास योजनेतून सदनिका मिळू शकणार आहे.

### योजनेबद्दल काही महत्त्वाच्या बाबी...

» शहरात पीएमएवाय २.० योजनेची अंमलबजावणी सुरु
» महापालिकेतर्फे नव्या निकषांनुसार गृहप्रकल्पाची आखणी
» शहरात नऊ ठिकाणी आरक्षित भुखंडावर प्रकल्प प्रस्तावित
» रावेतमध्ये पहिल्या प्रकल्पासाठी सल्लागाराची नियुक्ती
» मोठे घर व उत्पन्न मर्यादा वाढल्याने लाभार्थ्यांना दिलासा
» जास्तीत जास्त लाभार्थ्यांना मिळणार सदनिका

“ पिंपरी-चिंचवड शहरात पीएमएवाय २.० योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी महापालिकेने राज्य व केंद्र सरकार यांच्याशी समन्वय साधून काम सुरु केले आहे. जेणेकरून पात्र शहरी नागरिकांना परवडणाऱ्या घरांचा लाभ मिळू शकेल. ही योजना टप्पाटप्प्याने व धोरणात्मक पद्धतीने राबविण्यात येईल. तसेच, वाढवलेली उत्पन्न मर्यादा, घराच्या किमान कार्पेट क्षेत्रफळामध्ये वाढ आणि झोपडपट्टीवासीयांचा समावेश, यामुळे पिंपरी चिंचवडमधील हजारो नागरिकांना या योजनेचा लाभ घेता येणार आहे.

**- संजय कुलकर्णी, मुख्य अभियंता, पिंपरी-चिंचवड महापालिका**

# ...अजून किती बळी जाण्याची वाट पाहताय

## सावतामाळी मंदीरापासून ते वडाचा मळा पर्यंत तीव्र उताराचा भाग असल्याने गाड्या सुसाट

**पिंपरी | प्रतिनिधी**

परिसरातील सावतामाळी मंदीरापासून ते वडाचा मळा पर्यंत तीव्र उताराचा भाग असल्याने गाड्या सुसाट येतात. परिणामी अपघाताचे प्रमाण वाढले आहे. काही महिन्यांपूर्वी त्या रस्त्यावर दोघांचा जीव जाग्यावर गेला आहे. तर विद्यार्थ्याचाही अपघात झालेला आहे. त्यामुळे तत्काळ गतिरोधक टाकावे अशी मागणी केली जात आहे.

सावता माळी मंदीरापासून खाली तीव्र उताराचा रस्ता आहे. त्यामुळे येणारी वाहने वेगाने उताराच्या दिशेने जातात. वडाचा मळापर्यंत वाहनांचा वेग जास्त असतो. यामुळे काही नागरिकांचा तसेच विद्यार्थ्याचा बळी गेला आहे. त्यामुळे गतिरोधक बसवावा अशी मागणी जाधववाडीतील ग्रामस्थांकडून केली जात आहे.




“ या रस्त्यावर तीव्र उतार असल्याने गतिरोधक अत्यावश्यक आहे. अपघाताचे प्रमाण जास्त आहे. आतापर्यंत तीन जणांचे बळी गेले आहेत. प्रशासन अजून किती बळी जाण्याची वाट पाहणार आहे. पुढील अपघात टाळण्यासाठी तत्काळ गतिरोधक टाकावेत.

**- अश्विनी जाधव, माजी नगरसेविका.**

“ या रस्त्यावर गतिरोधक नसल्याने यापर्वीच तीन जणांचे बळी गेले आहेत. त्यामुळे गांभीर्य ओळखून गतिरोधक बसविणे गरजेचे आहे. तसेच तीव्र उताराच्या ठिकाणी समोर (पथदिव्याचा खांब) असल्याने अनेक वाहने रात्रीच्या वेळी तिथे धडकतात. त्यामुळे या खांबाचे स्थलांतर करावे.

**- प्रदीप आहेर, ग्रामस्थ.**

“ गतिरोधक टाकण्यासाठी वाहतूक विभागाचीही परवाणगी लागते. वाहतूक विभागाशी समन्वय साधून लवकरात-लवकर गतिरोधकाचे कामकाज करून घेऊ.

**- नरेश जाधव, स्थापत्य विभाग.**

# 'संध्याकाळी चारच्या आत घ्यावे दर्शन', गणेश मंडळांची VVIP ना सूचना

## प्रमुख मंडळांच्या बाप्पाच्या दर्शनासाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच अतिमहत्त्वाच्या व्यक्ती नेहमीच हजेरी लावतात

**पुणे | प्रतिनिधी**

गणेशोत्सवात मानाच्या गणपतींसह अन्य प्रमुख मंडळांच्या बाप्पाच्या दर्शनासाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच अतिमहत्त्वाच्या व्यक्ती नेहमीच हजेरी लावतात. बहुतांश व्यक्तींचा ताफा सायंकाळनंतर शहरात दाखल होतो. त्यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर खबरदारी म्हणून मंडळालगतचा परिसर तसेच महत्त्वाचे रस्ते बॅरिकेड लावून बंद करण्यात येतात.

त्यामुळे शहरातील महत्त्वाचे रस्ते तसेच चौक बंद होत असल्याने त्याचा त्रास गणपती देखावे पाहण्यासाठी आलेल्या भक्तांना होतो. त्यामुळे गणेशोत्सवात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह अतिमहत्त्वाच्या व्यक्तींनी चारच्या आत दर्शन घ्यावे, असे आवाहन सोमवारी (दि. 4) गणेशोत्सव मंडळांकडून करण्यात आले.

पुणे शहर गणेशोत्सव समितीच्या वतीने गणेशोत्सव मंडळ कार्यकर्त्यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. स्वारगेट येथील हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे व्यंग्यचित्रकार कलादालनाच्या सभागृहात पार पडलेल्या बैठकीवेळी रवींद्र माळवदकर, श्रीकांत शिरोळे, अंकुश काकडे, बाळासाहेब दाभेकर, शिरीष मोहिते आदी मान्यवर उपस्थित होते. या वेळी शहरातील विविध मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी आपले मत व्यक्त केले.

मान्यवरांच्या दौऱ्यांसाठी रस्ते व रस्त्यांवरील वाहतूक बंद करण्याच्या प्रकारांमुळे शहराच्या पूर्व भागाकडील गणेशोत्सव मंडळांचे देखावे पाहण्यासाठी भाविक जाऊ शकत नाहीत. परिणामी, दिवस-रात्र मोठ्या कष्टाने उभे केलेले देखावे पाहण्यासाठी नागरिक फिरकत नसल्याने कार्यकर्त्यांचा हिरमोड होतो. याच कारणामुळे पूर्व भागातील बऱ्याच मंडळांनी गेल्या काही वर्षांपासून भव्यदिव्य देखावे न करण्याचा निर्णय घेतला होता. त्या पार्श्वभूमीवर रस्ते सुरू राहिल्यास नागरिकांची गैरसोय टळेल.



### छोट्या मंडळांसोबत भेदभावाची वागणूक

» दरवर्षी सकाळी दहा वाजता मिरवणूक सुरू झाल्यानंतर रात्री नऊपर्यंत विसर्जन होईपर्यंत अवघी दहा ते बारा मंडळे जातात. त्यानंतर त्याच वेळेत दोनशेहून अधिक मंडळे जातात, हा मोठा विरोधाभास आहे. मानाची मंडळे दहा वाजता निघतात.मात्र, त्यांना रात्री नऊ वाजतात. त्याचे कारण शोधण्याची गरज आहे. उर्वरित मंडळांमध्ये जागा राहिली, तर पोलिस काठ्या वाजवत मंडळ पुढे घेण्यास सांगतात. मात्र, मानाच्या मंडळांसाठी लागणाऱ्या वेळेबाबत कोणी बोलत नाही. त्यामुळे छोट्या मंडळांसोबत भेदभावाची वागणूक कशासाठी? असा सवालही उपस्थित करण्यात आला

### बैठकीत कार्यकर्त्यांचे हे मुद्दे ठरले लक्षवेधी

» बाप्पाची विसर्जन मिरवणूक सकाळी सात वाजता सुरू व्हावी.
» विसर्जन मिरवणुकीत साउंड सिस्टिमचा वापर कमी करावा.
» काळानुसार खूप गोष्टी बदलतात, याचा स्वीकार करायला हवा.
» मध्यवर्ती भागातील रस्त्यांचा आग्रह न धरता परिसरात मिरवणूक काढावी.
» गणेशोत्सव हा कार्यकर्त्यांचा असल्यामुळे कार्यकर्त्यांनी नियोजन करणे गरजेचे.
» कलाकारांना ठरलेल्या रकमेनुसार मानधन अदा करण्यात यावे.

### छोट्या मंडळांनाही मिळावा मानपान

» यंदाच्या वर्षी काही मंडळांनी मानाच्या गणपतीपाठोपाठ विसर्जन मिरवणुकीत सहभागी होण्याचा निर्णय घेतला. त्याचप्रमाणे अन्य मंडळांनीही सकाळी सातच्या सुमारास मिरवणुकीस सुरुवात करणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. आमची मंडळेही सकाळी सातच्या सुमारास मिरवणुकीत सहभागी होतील. त्यामुळे प्रशासनाने आमच्या मंडळाचा आदर करण्याची आवश्यकता आहे. मानाच्या गणपतीच्या मंडळांनी मानपान स्वीकारत मिरवणुकीत सहभागी होण्यास आमची काही हरकत नसल्याचे मतही या वेळी व्यक्त करण्यात आले.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानात खेड तालुका आदर्श


## महसूल सप्ताहात एकाच दिवशी 4721 लाभार्थ्यांना शासकीय सेवा

**पुणे | प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत संपूर्ण महाराष्ट्रात सध्या महसूल सप्ताह साजरा होत असताना, खेड तालुक्याने आपल्या कार्यक्षमतेचा व परिणामकारकतेचा एक वेगळाच आदर्श निर्माण केला आहे. महसूल सप्ताहाअंतर्गत 1 ऑगस्ट रोजी एकाच दिवशी तालुक्यातील 11 मंडल महसूल विभागांमार्फत तब्बल 4 हजार 721 शेतकरी आणि नागरीकांना थेट विविध शासकीय योजनांचा लाभ देण्यात आला.

ही माहिती खेडचे तहसीलदार प्रशांत बेडसे यांनी दिली. त्यांच्या नेतृत्वाखाली व प्रांताधिकारी अनिल दौंडे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या अभियानात निवासी नायब तहसीलदार चेतन मोरे, महसूल नायब तहसीलदार राम बीजे, संजय गांधी निराधार योजनेच्या नायब तहसीलदार मनिषा खैरे, सर्व मंडल अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, ग्रामसेवक, पोलीस पाटील, कोतवाल, आदींनी संयोजन व अंमलबजावणीची जबाबदारी लीलया पार पाडली.

या उपक्रमाच्या माध्यमातून महसूल विभागाने नागरिकांच्या दारात सेवा हे उद्दिष्ट प्रत्यक्षात उतरवले आहे. पूर्वी तासन्तास तहसील कार्यालयाच्या रांगेत उभे राहून मिळणाऱ्या सेवा आता गावातच एका दिवसात दिल्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. तहसीलदार बेडसे यांनी सांगितले की, ही योजना म्हणजे केवळ शासकीय कागदपत्रे वाटप नव्हे, तर लोकसहभागातून सुशासनाचा एक प्रेरणादायी नमुना आहे. यापुढेही महसूल विभाग अशाच पद्धतीने सेवा देण्याचा प्रयत्न करेल.



### लाभार्थ्यांना मिळालेले सेवा-लाभ

» जातीचे दाखले, उत्पन्न प्रमाणपत्र, जन्म व मृत्यू दाखले, ई-केवायसी रेशनकार्ड, आयुष्मान भारत कार्ड, संजय गांधी निराधार योजनेतील लाभार्थी निवड, शेतकऱ्यांसाठी 7/12 उताऱ्यावर वारसनोंदी, मयत नावे कमी करणे, एकत्र कुटुंब प्रमाणपत्र (एकुंम्या), अँग्रीस्टॅक नोंदणी, पीएम किसान योजनेअंतर्गत नोंदणी या सेवा लाभार्थ्यांना एका दिवसात उपलब्ध करून देण्यात आल्या.

### मंडलनिहाय कामगिरी

» या अभियानात कनेरसर मंडल आघाडीवर असून 817 लाभार्थ्यांना सेवा मिळाल्या. त्यानंतर आळंदी मंडल 701, पिंपळगाव तर्फे चाकण 530, कंरजविहिरे 541, वेताळे 504 या मंडळांनीही उल्लेखनीय कामगिरी बजावली. दुसरीकडे, काही मंडळांनी अपेक्षेपेक्षा कमी कामगिरी केली आहे.